# नवे वर्ष अतिजलद आणि सुकर प्रवासाचे

## मेट्रो, सागरी सेतूवरून प्रवास सुरू होणार; भूमिगत मेट्रोचे स्वप्नही प्रत्यक्षात

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** मुंबईतील लोकलमधील वाढती गर्दी, रस्त्यावरील वाहतूक कोंडी आणि धकाधकीच्या प्रवासाला कंटाळलेल्या मुंबईकरांना नव्या वर्षात प्रवासासाठी नवनवीन पर्याय उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे प्रवाशांचा प्रवास सुकर आणि अतिजलद होण्याची आशा आहे.

नव्या वर्षात मंबई-नवी मुंबई अंतर केवळ २० मिनिटांत पार करता येणार आहे. तर दुसरीकडे दहिसर - अंधेरी, डी. एन. नगर प्रवास गारेगावर आणि सुकर होणार आहे. त्याच वेळी भूमिगत मेट्रोतून प्रवास करण्याचे मुंबईकरांचे स्वप्नही पूर्ण होण्याची शक्यता आहे. नव्या वर्षात महत्त्वाकांक्षी असा मुंबई पारबंदर प्रकल्प (शिवडी-न्हावाशेवा सागरी सेतू) वाहतूक सेवेत दाखल होणार आहे. तर दुसरीकडे 'दहिसर - डीएन नगर मेट्रो २ अ' आणि 'दहिसर - अंधेरी मेट्रो ७' मार्गिकेतील दुसरा टप्पा वाहतूक सेवेत दाखल होत आहे. त्याच वेळी 'कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३' मेट्रो मार्गिकेतील आरे - बीकेसी हा पहिला टप्पा कार्यान्वित करण्याचा मुंबई मेट्रो रेल कॅार्पोरेशनचा (एमएमआरसी) प्रयत्न आहे.

कोपरी उड्डाणपूल, ऐरोली-कटाई उन्नत रस्ता प्रकल्प पूर्ण होऊन वाहतूक सेवेत दाखल होणार आहे. या प्रकल्पामुळे एमएमआरमधील वाहतूक कोंडीचा प्रश्न काही अंशी सुटणार आहे. दुसरीकडे वसई-विरारवासीयांना नव्या वर्षात मुलबक पाणी उपलब्ध करण्याचा संकल्प सोडण्यात आला आहे. सूर्या प्रादेशिक पाणी प्रकल्पातील पहिला टप्पा २०२३ मध्ये सुरू होणार आहे.

## महत्त्वाच्या पाच प्रकल्पांचा थोडक्यात आढावा



### मुंबई पारबंदर प्रकल्प

मुंबई - नवी मुंबई अंतर केवळ २० ते २५ मिनिटांत पार करता यावे यासाठी एमएमआरडीएने २०१८ पासून २२ किमी लांबीचा मुंबई पारबंदर प्रकल्प अर्थात शिवडी - न्हावाशेवा सागरी सेतू प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाचे आतापर्यंत ८५ टक्क्यांहून अधिक काम पूर्ण झाले आहे. १७,८०० कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पाचे काम सध्या वेगात सुरू असून डिसेंबर २०२३ अखेरीस सागरी सेतू वाहतूक सेवेत दाखल करण्याचा एमएमआरडीएचा मानस आहे.

### 'मेट्रो २ अ' आणि 'मेट्रो ७'चा दुसरा टप्पा

दहिसर - अंधेरी आणि दहिसर - डी. एन. नगर प्रवास सुकर, तसेच अतिजलद करण्यासाठी एमएमआरडीएने अनुक्रमे 'मेट्रो २ अ' आणि 'मेट्रो ७' मार्गिकांचे काम हाती घेतले आहे. या दोन्ही मार्गिकांचा एकत्रित असा दहिसर - डहाणूकरवाडी - आरे असा पहिला टप्पा एप्रिल २०२२ मध्ये वाहतूक सेवेत दाखल झाला आहे. तर दुसरा टप्पा ऑगस्ट २०२२ मध्ये पूर्ण करण्यात येणार होता. मात्र काही कारणांमुळे काम रखडले असून आता हा टप्पा महिन्याभरात सुरू होण्याची शक्यता आहे. या टप्प्यासाठी केवळ सुरक्षा प्रमाणपत्राची पूर्तता होणे बाकी आहे.



### मेट्रो ३ चा पहिला टप्पा

सध्या 'कुलाबा - वांद्रे - सीप्झ मेट्रो ३' प्रकल्पाचे काम युद्धपातळीवर सुरू असून या भूमिगत मेट्रोमधून प्रवास करण्याचे मुंबईकरांचे स्वप्न नव्या वर्षात पूर्ण होण्याची शक्यता आहे. या ३३.५ किमी लांबीच्या मार्गिकेवरील आरे - बीकेसी असा ११ किमी लांबीचा पहिला टप्पा डिसेंबर २०२३ अखेरीस वाहतूक सेवेत दाखल करण्याचा एमएमआरसीचा प्रयत्न आहे. त्यादृष्टीने एमएमआरसीने कामाला वेग दिला आहे. हा टप्पा सेवेत दाखल झाल्यास आरे - बीकेसीदरम्यान वाहतूक कोंडीमुक्त आणि अतिजलद असा प्रवास करणे शक्य होणार आहे.

### छेडानगर वाहतूक सुधार प्रकल्प



पूर्वमुक्त मार्गावरून येणाऱ्या वाहनांमुळे छेडानगर जंक्शन येथे होणाऱ्या वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी एमएमआरडीएने छेडानगर वाहतूक सुधार प्रकल्प हाती घेतला आहे. यात शीव - ठाणे, मानखुर्द - ठाणे आणि छेडानगर असे तीन उड्डाणपुल, तसेच एक सब-वे बांधण्यात येत आहे. यापैकी छेडानगर उड्डाणपूल यापूर्वीच वाहतुकीससाठी खुला करण्यात आला आहे. आता नव्या वर्षात, जानेवारीअखेरीस यापैकी मानखुर्द - ठाणेदरम्यानचा १२३५ मीटर लांबीचा उड्डाणपूल वाहतुकीस खुला होणार आहे.

### सूर्या प्रादेशिक पाणी प्रकल्प

मीरा-भाईंदर आणि वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील २७ गावांची तहान भागविण्यासाठी एमएमआरडीएने २०१७ पासून सूर्या प्रादेशिक पाणी प्रकल्पाचे काम हाती घेतले आहे. सुमारे १३२५.७८ कोटी रुपये खर्च करून राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे (वसई-विरार टप्प्याचे) ९२ टक्के काम पूर्ण झाले आहे. हा प्रकल्प मार्च २०२३ मध्ये कार्यान्वित होणार असून यामुळे वसई-विरार परिसरातील पाणी पुरवठ्याचा प्रश्न निकाली निघणार आहे.